**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्र**

- **मिरा भाईंदर महापालिकेचा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संपन्न**

मिरा-भाईंदर, २८ जानेवारी २०२५:मराठी भाषा संवर्धनासाठी मिरा भाईंदर महापालिकेतर्फे आयोजित पंधरवडाच्या समारोप मंगळवारी, २८ जानेवारी रोजी झाला. यावेळी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि एकांकिका आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा केला जातो. या पंधरवडानिमित्त मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवारी या पंधरवड्याचा समारोप झाला. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महापालिकेतर्फे मंगळवार २८ जानेवारी रोजी पालिकेच्या बुद्धविहार केंद्रात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते त्यात वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि एकांकिका आदींचा समावेश होता.

मराठी भाषेचा समृध्द इतिहास, वारसा, विकास, मराठी भाषेचे सांस्कृतिक महत्व, मराठी ही ज्ञानभाषा, मराठी भाषा आणि सांस्कृतिक अस्मिता, मराठी आमचा मायबोली, महाराष्ट्र भूमी आणि मराठी भाषा, मराठी भाषेचा गौरव दिन, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा, जय जय महाराष्ट्र माझा मी मराठी, महाराष्ट्र ही संताची भूमी, कलेच्या माध्यमातून भाषा संवर्धन आणि मराठी भाषेचे सौंदर्यशास्त्र आणि अभिजातता या विषयांवर वकृत्व स्पर्धा आणि निबंध स्पर्धा घेण्यात आली. मराठी भाषेसंबंधी महानगरपालिकेच्या कर्मचारी वृंदामार्फत मराठीचा जागर व शूभमंगल... पण... सावधान या दोन एकांकिका सादर करून मराठी भाषा संवर्धन पंधरवडाची सांगता करण्यात आली. दोन्ही एकांकिकेतील कलाकारांनी आपली पात्र अतिशय उत्तम रंगवून कार्यक्रमात रंगत आणली आणि उपस्थित मनपा अधिकारी व कर्मचारी यांची मने जिंकली. मराठी भाषा संवर्धन दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाची सांगता अतिशय उत्साहात आणि आनंदात झाली.

मराठी भाषेचे वैभव जपणे, मराठी भाषेचे संवर्धन करणे, मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करणे आवश्यक असून त्यादृष्टीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांमुळे मराठी भाषेच्या संवर्धनाला मदत होईल, असा विश्वास आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांनी व्यक्त केला

याप्रसंगी, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, सहाय्यक संचालक नगररचना पुरुषोत्तम शिंदे, सहाय्यक आयुक्त सुनिल यादव, सहाय्यक आयुक्त कांचन गायकवाड, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, सहाय्यक आयुक्त सुधीर लेंडवे, सहाय्यक आयुक्त दत्तात्रेय वरकुटे, माहिती व जनसंपर्क अधिकारी जितेंद्र कांबळे, स्पर्धा परीक्षक आणि महापालिका कर्मचारी उपस्थित होते.